
म. ग्रं. सं. पुणे.
विषय काव्य
सं. क्र.

फ. मुं. शिंदे



REFBK-0026234
REFBK-0026234

# आई आणि इतर कविता

संदर्भ काव्य
२६७४
२६२३४
घ७७१९०

# आई आणि इतर कविता

फ. मुं. शिंदे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६७४
२६२३४
काव्य घ७७१९०
मुख्य शाखा

**फ. मुं. शिंदे**

**यांचे इतर**
**कवितासंग्रह**

जुलूस
आदिम
वृंदगान
अवशेष
सार्वमत
दिल्ली ते दिल्ली
फकिराचे अभंग
प्रार्थना
गाथा

# आई आणि इतर कविता

फ. मुं. शिंदे

REFBK-0026234
REFBK-0026234

सुरेश एजन्सी, पुणे

Aai aani itar kavitaa
Marathi Poems by Famu Shinde

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© फ. मुं. शिंदे
औरंगाबाद

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट, १९९०

मुखपृष्ठ
अनिल उपळेकर

किंमत पंचवीस रुपये

मुद्रक
उल्हास लाटकर
अक्षर चिंतामणी
४७४ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

आई यमुना
आणि
वडील मुंजाजी
यांच्या मायेतून मिळालेल्या
जन्माच्या शिदोरीसाठी !

## आभार

डॉ. गंगाधरराव पानतावणे, 'इंप्रिंट'चे संस्थापक संपादक श्री. आर. व्ही. पंडित, श्री. माधवराव गडकरी, श्री. वामन देशपांडे, प्राचार्य बागल सर, प्रा. चंद्रकुमार नलगे, श्री. विश्वास शिंदे, श्री. रामदास फुटाणे, श्री. महावीर जोंधळे, श्री. दया पवार, श्री. विजय निरखी, श्री. विजय रणदिवे, श्री. भगवान सवाई, श्री. अरुण इंगळे, श्री. सुधीर गव्हाणे, सौ. ज्योत्स्ना हर्डीकर, श्री. सुंदर लटपटे, श्री. अविनाश खेरडे, प्रा. सुरेश जाधव, प्रा. पंडित शिंदे, प्रा. सौ. लीला शिंदे, कपिल शिंदे, कु. ऋचा शिंदे आणि श्री. बाळासाहेब कारले तसेच प्रेस कामगार व चित्रकार.

**संपादक**

अस्मितादर्श, मुंबई सकाळ, लोकप्रभा, मराठवाडा, पुढारी, लोकमत, अजिंठा इ.

औरंगाबाद आकाशवाणी, शिवाजी विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ.

## अनुक्रमणिका

आई : ११ / आठवणी मृत्यूच्या : १४ / अरुण सरनाईक : एक निमित्त १९ / ऋषिमाणूस गेला तेव्हा : २३ / स्मृतिस्थळ : २७ / देठ : २८ / आत्महत्या : २९ / निळू फुले : ३० / दुष्काळ : ३१ / मित्रा माझ्या पावसा रे : ३२ / महापूर : ३४ / विदूषक : ३६ / झड : ३७ / लता मंगेशकर : ३९ / मन : ४१ / पृथ्वी : ४२ / अंतःकरण : ४४ / मयसभा : ४६ / सूळ : ४७ / कोडं : ४८ / मूळ : ४९ / कुंपण : ५० / आंधळा : ५१ / कोपरा : ५२ / वनवास : ५४ / सावळा : ५५ / गौतम : एक चिंतन : ५६ /

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## आई

आई एक
नाव असतं
घरातल्या घरात
गजबजलेलं
गाव असतं !

सर्वांत असते
तेव्हा
जाणवत नाही
आता नसली
कुठंच
तरीही
नाही म्हणवत नाही.

जत्रा पांगते
पालं उठतात
पोरक्या
जमिनीत
उमाळे
दाटतात

आई मनामनात
तशीच
जाते ठेवून काही
जिवाचं जिवालाच
कळावं
असं
जाते देऊन काही

आई असतो
एक धागा
वातीला उजेड दावणारी
समईतली जागा

घर उजळतं
तेव्हा
तिचं नसतं भान
विझून गेली
अंधारात
की
सैरावैरा धावायलाही
कमी पडतं रान !

पिकं येतात
जातात
माती मात्र व्याकुळच
तिची कधीच भागत नाही
तहान
दिसत काहीच नसलं
डोळ्यांना
तरी
खोदत गेलो
खोल खोल
की
सापडतेच अंत:करणातली
खाण

याहून का निराळी
असते आई ?
ती घरात नाही
तर मग
कुणाशी बोलतात
गोठ्यात
हंबरणाऱ्या गायी ?

आई खरंच
काय असते ?
लेकराची
माय असते
दुधाची
साय असते
लंगड्याचा
पाय असते
धरणीची
ठाय असते !

आई असते
जन्माची शिदोरी
सरतही नाही
उरतही नाही !

आई एक
नाव असतं
नसते तेव्हा
घरातल्या घरात
गल्बललेलं गाव असतं !

## आठवणी : मृत्यूच्या

मनातल्या
अनन्वित जखमांच्या
काळोखातून
संपतानाच आरंभ झालेल्या
क्रांतिकारकाच्या स्वप्नांच्या
कमळदळातून
समुद्राच्या
तळातून
वर येतो
अलगद ओघळतो
अश्रूचा थेंब
गालावर;
प्रचंड पोकळीत
कदाचित् मातीच्या उरात
कदाचित्
सृष्टीच्या सर्जनात
जिरून जाते
श्वासयात्रा;
निमंत्रणासाठी
रुसत नाहीत
विशाल मनाची माणसं

तसाच मृत्यू
अंतर्धानातून आठवणीसारखा
फक्त येतो !

आईच्या पापणीतल्या
बिऱ्हाडातून
गाईच्या गळ्यातल्या
दाव्याच्या
बिरड्यातून
जिभेतल्या लाळेतून,
प्रेयसीचं
सर्वांग झाकणाऱ्या
निवडुंगाच्या
स्पर्शातून
कॅन्सरच्या गाठीतून,
गर्भाशयाच्या
व्याकुळतेतून
तुटत चाललेल्या
मायेच्या वाळवंटातून
हरवून जाण्यासाठीच असलेल्या
अरण्यातून,
केव्हा तरी एकदाच
उमगलेल्या मनातून
पार निसटून जातो
पारा

काचांच्या ढिगाऱ्यात
प्रतिमांचे भास

रक्तावर साचतात;
हृदयापर्यंत वाहत जाते
आठवण
रक्तासारखी
आणि
गिळून टाकतो भूकंप
साऱ्या स्पंदनांचे
उत्सव !

थरथरणाऱ्या सिंहाच्या
लखलख्यातून
भक्ष्य विसरलेल्या
करुण पंजातून
सीमेत सामावत चाललेल्या
कल्पांतिक
यातनांच्या मुसळधार
पावसातून,
सताड उघडे ठेवलेल्या
तुरुंगांतून
अवसेच्या
अदृश्य चंद्रातून
येते
झिरपत झिरपत जाणीव :
‘ जिंदगी उसी की है
जो किसी का हो गया ’

आवरणात लुप्त होतात
हिशोबाच्या वह्या,

गाठी सोडताना
बोटांच्या टोकावर आपल्याही
फुलपाखरं बसतात
पंख पसरून
मृत्यूचे !

दोन मिनिटांच्या
शांततेतून
किनाऱ्यात
न मावणारा
दाटत जातो श्रद्धांजलीचा
तुडुंब पूर
बर्फ होतो शब्दांच्या
अवस्थांचा

मावळत्या किरणांचं
सोनेरी रेशीम
खाली खाली
घरंगळून जातं
काळे ढग ठेवून,
खिडकीच्या
तावदानातला प्रकाश
विझत चाललेल्या
मेणबत्तीसारखा
बुडत चाललेल्या
खोल
आवाजासारखा
का वाटतो ?

पंखातून
गळालेली पिसं
का फडफडतात
पुन्हा
दुखवट्याच्या ठरावात ?
कुणाकुणाचं आभाळ
गहिवरतं
चिरंतन सांत्वनात ?

सूत्रातल्या मण्यांच्या
मनोगतावर
पसरत जाते
कोणत्या प्रतीक्षेची
काळीभोर सावली ?
थांबवूनही
थांबवता येत नाहीत
मनाच्या मिनारातले
ध्वनि :
' करोगे याद तो
हर बात याद आयेगी
गुजरते वक्त की
हर मौज ठहर जायेगी '

आता एवढीच काय ती
जिवात धुगधुगी
की
आठवणी कधी
मरत नसतात !

## अरुण सरनाईक : एक निमित्त

नात्याच्या परिचित व्याख्या
कधी ढळतात
सुखाबरोबर
कधी ढाळतात
अश्रू अनावर

खरं तर
नात्यांना नसते तशी
कोणतीच व्याख्या,
व्याख्या
एक असतं कुंपण
संबंधाभोवतीचं
संबंध गुदमरतात
तिथंच
त्या मर्यादेत
तेव्हाही
तसंच तरीही
धावतात
माझ्याकडं
प्रश्न

होता अरुण सरनाईक
तुझा कोण ?

कोण होतास
तू त्याचा ?
कोण असतो कोणाला तसा
म्हणून
जमा होतात
पापणीत
पावसाचे ढग
आणि
कोसळतात अश्रू
धुवांधार
निखळ नात्याच्या शोकांतिकेत ?

अरुण सरनाईक होता
मृत्यू
माझ्या तीर्थरूप वडलांचा
वडलांच्या
मायेचा
शेवटी थरथरला असेल
त्या मूक ओठांतील
प्रचंड शब्दांचा !

मृत्यू सारखाच असतो
सर्वांचा
आठवले म्हणून मला
माझे वडील;
चिरंतन दुराव्यात
त्यांच्या मी
होतो गढलेलो
एका सकाळी

आणि
अरुण सरनाईक गेल्याची बातमी
धावत अंगावर आली
अभद्र अक्षरांतून काळी !

कुणी तरी
आपलाच असतो
केव्हा तरी
तेव्हा
पालवतात
अंतरातले अंकुर
आणि बहरतो
नात्यांचा
प्रदेश
हिरवागार असीम

दहिवरात गहिवरतात अश्रू
मोत्याचे
कोणालाच कळत नाही
काय असते नाव
त्या नात्याचे

तसाच होतो
मी
त्या सर्वांचा नातेवाईक
नकाच विचारू पुन्हा
कोण होता माझा
तो
अरुण सरनाईक !

मीच असतो
कुणी तरी
तो
मीच असतो
त्याची पत्नी
मीच असतो
पुत्रही
त्याचा
आणि
त्या सर्व संपण्यात
मीच असतो
शिल्लक
सर्वांची सावली
एक आकाशवेडी
सविता
दु:खानं गद्‌गदलेल्या
सर्व झाडांची
एक नितांत
कविता !

अरुण सरनाईक
एक निमित्त
बाकी सर्व
अटळ आहे
ज्यांच्या पापणीत फक्त
अश्रू
त्यांचाच चाललेला
छळ आहे !

## ऋषिमाणूस गेला तेव्हा

( कै. नरहर कुरुंदकर यांच्यासाठी )

शब्दासाठी सूर
होते आसुसले
जीवही दिसले
प्रतीक्षेत

समेचाच श्वास
शब्दांतून चाले
व्यासाचे संपले
संकीर्तन

रात्र कोमेजली
फुलांच्या ढिगात
कोणत्या रागात
गावे आता

गुंफून मायेचे
हारामधी डोळे
चिरंतन लळे
परागात

कुणी दिला असा
व्यासपीठा शाप
आलाप-विलाप
अश्रुब्रह्मी

माथा टेकवाया
राहिले न पाय
लेकरांची माय
गेली कशी

काही न सागता
जाऊ नये असे
जिवलगा पिसे
लागणार

कोणा द्यावी साद
कुणासंगे वाद
लयदार नाद
मिटताना

नव्या माणसाच्या
श्रद्धेचा आधार
तमावर वार
अखंडित

मनोऱ्यात कधी
अडकला नाही
तत्त्वज्ञान पाही
माणसात

अवती माणसे
भवती माणसे
विचार माणसे
चिंतनात

सोलून युगाला
आत्मे पारखले
प्रश्नही वाकले
उत्तरात

दारिद्र्यात कधी
रुतलेले डोळे
संहारात जळे
आत्मलीन

काळजास होता
स्वातंत्र्याचा रंग
आत्म्याचा दुभंग
साहिला न

रूप वास्तवाचे
हेरले काळात
सत्यही नाळेत
वेदनेच्या !

विसरली धार
तान्हेजले काठ
आसवांची लाट
गोदावरी

चिता चेतताना
सूर्य गेला पार
हुंदक्यांचा हार
अर्पिताना

काय बोलावे ते
आपणच सांगा
दर्शनास रांगा
शब्दार्थाच्या

मरण वाटते
अजूनही भास
मिटविते आस
श्रद्धांजली

## स्मृतिस्थळ

ही तीच वाट आहे
हा तोच घाट आहे
तुडुंब सागराचा
कोरडाच काठ आहे

मातीनेच ठसेही
पावलांचे झाकले
काळाचे झाड का
वाटेतच वाकले

पळणारा पायाशी
हा तोच साप आहे
कातीत कण्हणारा
हा तोच शाप आहे

नभास बोलणारे
हे तेच माळरान
मी कुठे सापडेना
सावलीस बेभान

ही तीच वाट आहे
हा तोच पाय आहे
ती वेचणारी काटे
आज कुठे माय आहे ?

## देठ

रोजच फाटत असतात
काळच्या कट्यारींनं ऊर
रोजच ओकते चिमणी
उद्याच्या बंचनेचा धूर

जमीन तीच आक्रमिणे
रोजच्याच वाटांच्या रेघा
पावलांच्या कवितेखाली
विषण्णतेच्या मृत भेगा

रोजच मी रोजच रोज
एकमेकांची पुनर्भेट
फुलासाठी रुसत नाही
दारिद्र्याचा व्यथित देठ

## आत्महत्या

आजकाल मेल्याशिवाय
मरणही कळत नाही
कळून येते सारे काही
मृत्यू तेव्हाच टळत नाही

दुसऱ्याच्याच मृत्यूला
कमालीचे मोल आहे
स्वतःचे जगणे मात्र
न्यायाचा ढोल आहे

मरतो त्याला उमगतं
किंमत दिलीच पाह्यजे
वर्तमानानं भविष्याला
हिंमत दिलीच पाह्यजे

स्वातंत्र्य तसे लोकशाही
प्रयोगांची गुलाम आहे
कुठे कसा दडलेला हा
स्वराज्यातला राम आहे

का भुकेच्या स्वातंत्र्याला
भ्रष्टाचार टांगतो आहे
खरी गोष्ट जो तो चोरून
एकमेकास सांगतो आहे

आत्महत्या हेच अखेर
साधे सोपे असेल मरण
कुणी सांगावे कसे केव्हा
सर्वांसाठी फुटेल धरण !

## निळू फुले

राज्यात दलदलीच्या
रुतलेली रात्र आहे
सूर्य तुझ्या डोळ्यातून
उगवतो मात्र आहे

उघडून नीती आहे
खाटकाने टांगलेली
रक्तास चटावलेले
अहिंसेचे शस्त्र आहे

माणसाच्या करुणेने
गलबले जीव तुझा
हृदयास चेतविते
हृदयाचे शास्त्र आहे

थोपविण्या सूर्यास्त
पहाडही पचवितो
स्वातंत्र्य व्यापणारे
गगनाचे गात्र आहे

सत्तेपुढे नमलेले
सत्यही थरकापते
सिंहासनास प्रिय
मदिरेचे पात्र आहे !

## दुष्काळ

खोल जमिनीत पाणी
गर्भातच अटलेले
नाते मेघाच्या मायेचे
आसवात फाटलेले

माती गगनाची माय
तिचे करपले मन
सांगे तापल्या उन्हास
झाड सावलीचे ऋण

घाम लुटतात त्यांच्या
झरे धनास फुटती
चिराभेगांनी ऊर
खिन्न शेताचे फाटती

आला जीवातून जीव
झाला जिवाला पारखा
ओस रांजणाचे जग
दारी दुष्काळ सारखा !

## मित्रा माझ्या पावसा रे

गेले मनास मातीच्या
भेगा-भडोळ्यांचे तडे
जीव मासोळी होऊन
नदी नाला तडफडे

तापलेल्या दिवसाचे
रात्री भरतात डोळे
आसवांना आठवते
स्वप्न पावसाचे खुळे

नाते मृगाचे मोडले
पावसाने ढगातून
नीतिनेम असे कसे
हद्दपार जगातून

भाव शृंगारसुखाचे
जळताना जपलेले
अंकुराचे पालवीचे
क्षण आत लपलेले

गरजेल बरसेल
केव्हा सोयरा पाऊस
प्रतीक्षेत म्हणूनच
आर्त जमिनीची कूस

सारा शोषून सुकाळ
दोस्त दुष्काळाचा झाला
गेला निघून पाऊस
म्हणताना आला आला

चकवितो चुकवितो
ढगांनाही झुलवितो
तान्हेजल्या शेतालाही
पावसाळा भुलवितो

कुठे लपवितो तोंड
कुठे पळतो दुरून
खोट्या मनासारखेच
येते आभाळ भरून

नेत्यापुढाऱ्यासारखीच
गत पावसाची झाली
सारा समुद्र पिऊन
सर बारकीच आली

न्यावी जमिनीने कुठे
वर्षावर्षाची तहान
झाले पावसाचे मन
थेंबाइतके लहान

मित्र माझ्या पावसा रे
भुई जशी होते चिंब
तसे मातीच्या मनाचे
डोहाडोहातून बिंब !

## महापूर

जिथे फक्त आहे माया
आणि गरिबीची छाया
खोट्या ईश्वराचा भाव
जातो करुणेचा वाया

कुठे भिंत बोलावते
छत कोसळते कुठे
नाही कुठे पहाटच
सूर्य काचेगत फुटे

नाही भेटत तेव्हाही
आणि भेटतो तरीही
कसा पाऊस हा वैरी
नाही खबर घरीही

होते आधीच दु:खाच्या
डोहातच बुडलेले
कशासाठी महापूर
त्यांच्यासाठी बिघडले

जीव लावून पाण्यास
किती तरंगले जीव
टाहो फुटती, येईल
कधी विठ्ठला रे कीव

नाही आवाज आकांत
पोर खिडकीत मेले
प्रतीक्षेत पाण्याखाली
सारे हरपून गेले

किती नितळ गढूळ
झाले बेइमान पाणी
देव-देव्हाऱ्यासकट
नाही तरलेच कोणी

दिले लाखही हातांनी
तरी सापडेना हात
नाही समईच जिथे
कशी पेटणार वात !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## विदूषक

आसवांना देतो डोळे
देतो वाहण्यास वाट
किनारेही नसलेल्या
सागरास देतो लाट

देतो स्वप्नेही दिव्याची
उभ्या उजाड खांबास
माया भिजलेली देतो
मातीसोबत कोंभास

टाहो–हुंदक्यास देतो
त्याचे अनावर स्वर
विदूषकाचे काळीज
दुःख-वेदनांचे घर !

## झड

कशासाठी पावसाने
डोळे भिजवावे
आठवात आसवाच्या
स्वप्न रुजवावे

यावे जावे हेही तसे
ओघानेच येते
रात्र चिंब चेतनाही
ओठानेच देते

कुणी नसताना जेव्हा
धो धो बरसतो
ज्याचा त्याच्यासाठी किती
जीव तरसतो

कशासाठी पावसाने
जग जागवावे
दु:खाच्याच मेण्यातून
सुख मागवावे

अंतराच्या अत्तराची
घुमते घमघम
शहारून मोहरून
रमते रिमझिम

येई मनातून राधा
स्पर्शात धारांच्या
खुले पिसाऱ्यात कृष्ण
मोहित मोरांच्या

कुठे उदास मनाला
पालवीच्या कळा
माळरानी कुठे गातो
गवताचा गळा

काय देतो काय नेतो
विचारावे कुणा
नवी ओढ लावतो का
पाऊसही जुना ?

पावसाचे बरे आहे
बरसतो जातो
मात्र झुरण्याची झड
झिंगत ठेवतो

यावे वाटतेच तरी
पावसाने पुन्हा
सुखदु:खाच्या त्याही
नव्याजुन्या खुणा !

## लता मंगेशकर

पावसाच्या थेंबाची
मातीस तहान होती
भिजलेल्या तरी तुझ्या
कंठाची आण होती

तृप्तीत जलधारांच्या
वसुंधरा न्हात होती
व्याकुळ स्वरात मग्न
एकटी उन्हात होती

कधी तरारले कोंभ
कधी अंकुर जळले
रान तेव्हाही तुझ्या
हृदयाकडेच वळले

बहर खुलले फुलले
ऋतू हसले रुसले
फुलपाखरू नादाचे
रंग होऊन बसले

जळणारे दु:ख असो
असो सुख भाळणारे
गीत तुझे चिरंतन
रक्तातून खेळणारे

डोळ्यातून आजच्या
उगवतो काल नवा
रात्रीला उजळतोच
उद्याचा आज दिवा

अनंत अनामिकांस
कान हेच नाव आहे
तुझ्या स्वरांचे त्यांचे
एकमेव गाव आहे

कंठ तुझा फुलांच्या
आवडीचा छंद होतो
विषारी वाटणाऱ्या
धोतऱ्यास गंध येतो !

## मन

तिचं मन
भरून आलेलं
कशानं ते
नाही कळत
माझं धुपणारं
कशानंच
नाही जळत !

असं गुदमरलेलं
असतं काय
युगाचं
सांगायचं
क्षणांच्या शृंखलेत
अनंत वर्षे
अस्तित्व
टांगायचं !

कापरासारखे
विरून
गेले
क्षण
वाऱ्यावर
की
काय होत
असेल
त्याचं
कुठं असतं
ते तसं
मन ?

## पृथ्वी

बादळाच्या किनाऱ्यावर
अलगद उतरलो
सुखरूप,
बोटातल्या अंगठीतून
आभाळ अजमावलं
आणि
रक्ताचे प्रवाह खवळले
नंतर एकाच कालव्यातून

पाळू फुटून पसरणारं
कोंडलेलं पाणी
थबकलं

स्वप्नांजवळ पापण्यांच्या
का गरगरलं
स्वत:च्याच वलयात ?
का फुटले
अनादी शब्द
मुक्या तरंगांना ?

प्रवाहाचे
धर्म विसरून
थांबतात जेव्हा जलाशय
उराजवळ
छातीतल्या शराजवळ
गोठतो हिमालय तेव्हा
प्रेयसीच्या अनुपम
देहात !

कुणाची नाती
कुणाच्या ओठातून
पसरतात संवेदनाभर
यातनांचे समाधान
जखमातून अंगभर !

सर्जनाच्या डोहातून प्रचंड मासा
उसळतो
प्राणांचा देहादेहातून संबंध
घुसळतो
वादळ होतं माझंच तेव्हा
पृथ्वी थोडी थरथरते !

## अंतःकरण

खरंच असते का
त्याची काही गरज
की पटावी ओळख
कधीच्या तरी
जन्माच्या प्रसंगाची
कारण नसलेल्या
परिचयाची
परिचिताच्या अविश्वासाची
प्रेम देणाऱ्या
हृदयातल्या श्वासाची ?

काही द्यावसं वाटणं,
दिलं ते ते सर्व

अशक्य असलेल्या
संसारात थाटणं
म्हणायचं काय अशा
नियतीला ?
खरा भ्रम, खोटं वास्तव
की जगण्यातली
फक्त एकट्याची असह्य सल ?

का एखाद्या फांदीनं
असं उगवावं
बुंध्यावर,
पानांच्या प्रसन्नतेत
कधी सहवासात फुलांच्या
कधी प्रतीक्षेत नव्यांच्या,
खोडाच्या सालीला
मुळातून जागवावं ?

पापण्यांना चिकटतात
प्रश्न
तेव्हा
स्वप्नांची जवळ येतात
बिलगतात
झाडंच झाडं,
होतो डोळ्यांचा
सागर
अश्रूंनी म्हणावी कोणती
आपल्या अंत:करणाची
घागर ?

## मयसभा

माझ्या कवितेत श्वास कुणाचे
नसतात ठाऊक तुला,
तुझं हृदय जोडावं
त्या नळीला
हे तसं ओझं नसलं तरी
न दुखता खुपता
टाके भरून येणं
सुखाचं ठरावं !

जगातला विस्मय
तुझ्या दृष्टीत
माझ्यासमोर उभा,
पायातून शहारते
एखादी मयसभा
तेव्हा भासाचे भाव
स्वत:च लाजतात
आणि
दोघांचेही डोळे
भरून येतात अंधारात
बोटांचा गोफ ढिलावताना !

## सूळ

मनात वादळ
तरीही
डोळ्यातले समुद्र
स्थिर किनाऱ्यावर
हे कसं
ते कळत नाही !

मन मारून
कशाला कुणी
असं
नसलेल्या ईश्वरासारखं
काय बिलगावं ?

तिलाही कळतं
मलाही कळतं
कळण्याचे
शाप भोगताना
सुखाला कितीदा
चढवायचं
समजदार सुळावर ?

## कोडं

विश्वाला विसरतो
तेव्हा असतो
आपण कुठं ?
विश्वाला कवटाळतो
तेव्हा नसतो
आपण कुठं !

असतो आपलेच आपण
विश्व नसतं कोणतंच
कुणाचंही तेव्हा !

आपण असतो एकमेकांचे
तोच विश्वाच्या विजयाचा
खरं तर प्रारंभ

अखेर आणि प्रारंभ
यांची मिटून जाते रेषा आपल्यात
हळूहळू पहाट प्रगटते तेव्हा
विश्व उलगडण्याची !

## मूळ

कशी विसरतात फुलंही
की घ्यावा द्यावा निरोप
पानांना तेवढंच
हलकं वाटतं
आपल्याच वेगळ्या
रूपाचं
अप्रूप मनात दाटतं !

फुलं उमलतात
दरवळतात
रंगांनी खुलतात
पानांच्याच शेजारी
अनोळखी झुलतात

पानाफुलांची फांदी
फांदीचा बुंधा
बुंध्याचं झाड
मुळातलं अंतःकरण
मातीला मागतात
ते कुणासाठी ?

## कुंपण

तुझा हात
कुंपणाजवळ झुरणारा
पलीकडं,
माझा हात
कुंपणाला फितुर करू पाहणारा
अलिकडं,
कुंपण
फुलाच्या अंत:करणानं
दोघात दोलायमान,
काट्यांनी कळवळावं
इतके स्पर्श
सळसळणारे
ओठा–डोळ्यांतून !

हातात हात
कुंपणाची साथ
काट्याच्या काळोखात
फुलाची वात

हातांनाही नसावी खबर
केव्हा गळून पडलं कुंपण ?

## आंधळा

आकाश खरे तरीही
खोटेच का दिले पंख
विष सळसळले आणि
मग लटकाच का डंख

रिकाम्या पात्रात कसा
समुद्र मी साठवावा
टाळून मला चितेचा
अग्नी कसा पेटवावा

पाने फुले नसलेला
बहर कसा मी साहू
आंधळा सूर्य डोळीं
पहाट कसा मी पाहू !

## कोपरा

का कुणाच्या व्हावा
अस्तित्वाचा पारा
फिरून पुन्हा का
चिमटीत येरझारा

श्वास खोटे कसे
खोटाच का गंध
यात्रा कुणामुळे
डोळ्यातली बंद?

रंग उत्सवाचे
डसले कुणाला
भिनले का विष
एकान्त क्षणाला

तुझ्यातच होती
आषाढी थरथर
तुझ्यातच होता
खवळला सागर

का हरवली तू
मासोळी तळाशी
हितगुज करावे
किती मी जळाशी

विझला तरीही
जीव कापराचा
अदृश्य जळतो
कोपरा घराचा

हसण्यात अश्रू
झाकून जगावे
का भासात कुणी
जगाला बघावे

केसात न्हालेल्या
मन शिंपडावे
सख्यासाठी मग
परीने रडावे !

## वनवास

डोळ्यांतल्या आसवांना
सांग अर्थ कोणता
वेलीवरील फुलांचा
मांडव मी नेणता

आतले परागकण मी
सांग का झुलविले
बंद पाकळ्यांस तुझ्या
स्पर्शानि फुलविले

शब्द नाही न अर्थही
सांग का अशी मुकी
कोणत्या ग रामाची तू
वनवासी जानकी ?

ठाणे
२६९४
फाय २६२३४
६।११।९०

## सावळा

कोणते नाते कुणाचे
असते कशासाठी
अंतरीच्या बंधनात
रेशमाच्या गाठी

पापणीचे स्वप्न खुळे
पहाटेला खुलते
दुपारच्या उन्हात का
सावलीही सलते

कुंतलात गुंतला का
कृष्ण तुझा सावळा
ओरडतो आर्त कसा
फांदीवर कावळा !

## गौतम : एक चिंतन

१

काळाचं चाक कधी म्हणून
थांबलं का ?
आठवत असेल
तर सांगा !
नाहीच सांगता येणार
कुणाला;
असं ते थांबतही नसतं
कुणासाठी !
कुणामुळं पडत नाही
रुतूनही कुठं
पृथ्वीलाही कधी नाही आलं गिळता
काळाचं चाक !
वाहणाऱ्या प्रभंजनासारखा
हा काळ अनिरुद्ध
जाणवतो सर्वांना
पण आहे कुठं ?
शक्य आहे की
चकवता येईल काळाला
पण चुकवणार कसं ?

तो बांधतो सर्वांना
आपल्याशी
तो जोडतो क्षणांना
जगण्याशी
तो विसावतो

कधी वैभवात
कधी विनाशात !
तो देतो तुफानाची तुतारी
तरल तरंगांनाही !

काळाचा रंग कसा
कसं रूप त्याचं
त्याच्या मनाचं काय ?
काय भरलं आहे
त्याच्या विचारात ?
उलगडा होतो तिथंच
होते सुरुवात
नवीन कोड्याची !
मलाही कुठं होतो
उलगडा अजून माझा

मी कथन करणारा
आजचा
करतो कथन जे
ते कालचं
नाही कशावरून मी
कालचा ?
कथन फक्त कालचंच कसं ?

नसतो असला काही
काळाला भेद ठाऊक !
अखंडाचे
कुणी केले खंड —
काल, आज ?

दुसरं कोण
तुम्ही आम्हीच,
मीही त्यातलाच

काल आज उद्या
ही असते त्रिकालाची
रेषा एकच अखंड !

त्या सुप्त प्रवाहातून
खळाळणारी
काळाच्या नसांतून
सळसळणारी
चेतनेची लाट,
विशाल विश्वाची जाणीव
आदळली माझ्यावर !
लख्ख प्रकाशात
उजळलं एक नगर
कपिलवस्तु !

आठवलाच असेल महामानव
काळाला विशेषण देणारा
गौतम बुद्ध !
कपिलवस्तु तीच ही
राजपुत्राची
सिद्धार्थ गौतमाची !
कपिलवस्तूनं फार काही पाह्यलं
फार काही साह्यलं
ते सर्व
मला दिसतं आहे !

२

काळाचा परिघावरचा
बिंदूही पाह्यला
कपिलवस्तूनं !

गौतमाचं मन होतं
बंधनांच्या पलीकडचं !
सांगून सांगून
काय सांगणार
पुरोहित त्याला
ठाऊक नाही सिद्धार्थाला
असं कोणतं कर्तव्य होतं !

मनाचे
सर्व रंग
मनाच्या
सर्व बाजू
मनातले
सर्व लोभ
सर्व सर्व लालसा
निरखीत होता गौतम
फार जवळून
विकारांना होता दाखवीत
वाटा दुरून !

माणसांनी असायचं
गजबजलेलं मन त्याचं
तेव्हा तर अधिकच
तो असायचा एकटा !

काळाचा उन्माद
डोळे उघडायचा
उदात्त होऊन
गौतमाच्या दृष्टीतून !

खरं तर खूप छळलं
काळानं
गौतमाच्या संयमाला
फक्त पालटून वेष
न बाळगता मनात द्वेष !

गौतम होता
स्वतःच जाणीव
काळाची !

काळ होता चिंतनाचा
कणा त्याच्या
त्याचं चिंतन
हीच खरी
चिंता होती
जन्मदात्यांची !
सवंगड्यांची !

ऐश्वर्याच्या शापानं
माणूस होतो
संकुचित
अगदी लहान
जगासाठी उरतच नाही
त्याचं अस्तित्व

ओढ असते
वासनेच्या तृप्तीला
नव्या दंशाची !
विळख्यातून बाहेर
नाहीच पडू देत
भोगाचे साप !
झिंगून जातं
अस्तित्व
त्या विषानं

नको होता
असा कोणताच अंधार
गौतमाला;
फुटावा
अस्तित्वातून प्रकाश
या धर्माचं
होतं मन त्याचं !

नाहीच वळवता आलं
त्याचं मन
कुणाला
पाहत होती
कपिलवस्तु !

३

स्वतःला ढाळून घेतलं
काळानं
हृदयात गौतमाच्या;

काळाला मिळाली
गौतमाच्या विचाराची
लखाखती धार !

किनाऱ्यात न मावणारं
हृदय
आकाशकडांना छेदणारा
विचार
उरत नाहीत
कुणा एकट्याचे !

कुठल्याच मालकीची
स्वामित्वाची कशाच्याही
गौतमाला
नव्हती जाणीव !
तो होता
फुटलेला अफाट विस्तार
आतून बाहेर—
सीमांना
संकोच सांगणार
मातीला
माणसांशी सांधणारा !

धार कापून
पाणी का तोडता येतं !
जाणला अंत:स्थ प्रवाह
करुणेचा
सर्वत्र सारखा !

याहून अधिक हवं नसतं
माणसाला काही.

वाती पेटवणारे
लालसेच्या
भस्म करतात
भद्रता !
भ्रष्ट भावाचे
विद्रूप आकार
भेडसावतात मग कुठंही
कुणाला
त्यातून सुभग शिल्प
शोधणारा गौतम
निघतो भिजून
प्रेरणेत काळाच्या !

पहाडात दृष्टी ओतून
साकारावीत स्वप्नं
लेण्यांची
तसा गौतमाचा शोध
स्वत:तून पसाऱ्यात !

नितळ कांतीच्या ढगातला
माणसाजवळ आकार
ठेवला
माणूस कळावा माणसाला
म्हणून माणसानंच
माणूस घडवला !

काळाच्या प्रवाहात खळाळलं
रोहणीचं पाणी
कपिलवस्तूनं सोसलं
शस्त्राचं पाणी !

४

जिंकून मात करणारे
असतात
हरलेले आतून !

काळाचे शिलालेख
अक्षर;
अर्थ जोखला ते
बुडाले तळापर्यंत
आणि मंथनाला दिलं
मन माणसाचं !
फिरतो मनातून
काळाचा आंस
तेव्हा
गती होते
गगनगामी !

उमटू लागल्या
आकाशावरही
जमिनीच्या सीमा
तर लागेल गुदमरावं
वर्तुळातच क्षितिजाच्या !

गुदमरत नसते
कधी झेप मात्र;
पंखांच्या पावित्र्यानं
जिवाला ऊब देणारी
करुणा
विभागत नाही
मानवमात्रांना
रेषांनी !

एक अखंड
असीम चित्र
असतं डोळ्यात
काळोखासारखंच !

त्याच डोळ्यांना
लागतात
स्वप्नांचे घोस
तीच असतात
निखळ स्वप्नं
मानवतेची

बेचिराख भूमीतून
होतात नाहीसे
श्वास;
मिळत नसते मानवता
माणसांना मारून
नांदत नसते शांतता
मनांचे
गळे घोटून !

कशानंही फुटतो
गर्दीला गहिवर
गवसतो गर्दीला
बहुमताचा गर्व
तेव्हा
राहत नाही भान
माणसाचं !

माणसाचं हृदय
कपिलवस्तूला देणारा
गौतम दिसला
गर्दीतही !

२

हेतू गवसला की
जाणीव होते
सुखाची
काळालाही !
कोणतं असेल सुख
आर्त व्याकुळतेत ?

निराळीच असते
लौकिकता
त्या जाणिवेत
सुखाच्या;
संवेदनांच्या
पलीकडची !

का असावा काळाला
हेतू तरी ?
पण नसता खरोखरच
तसा
तर दिल्या असत्या कुणी
विश्वाला दिशा ?

होतो
एखाद्याच जगण्यात
आत्म्याचा ध्यास
विश्वरूप !
ते होतं
गौतमाचं जगणं;
होते झरे
त्याच्याही डोळ्यांत
अश्रूंचे !
फुटणार नाहीत त्याच्या
बंध कसे
मनाचे ?

माणसासारखाच असतो
माणूस अखेर
पण कोण घेतो
समजून
माणसाला !
समजून घेण्यातच
साहस असतं
समजुतीचं !

झेपलं ते
तरी पेलेलच
असं नाही !
गौतमाच्या गोतानं
काळजावर गोंदलं
गौरवाचं गाणं;
आर्त
करुण !
मिटलेल्या
पापण्यांच्या रांगांत

घरंगळला अंगावरून
काळ कपिलवस्तूच्या;
भरून आले डोळे
तिचेही !
भिजला अखेरचा प्रसंग
ठिबकणाऱ्या थेंबांत;
दिसलां तिला तो
धुक्यातून
ऐकू आला जन्मदात्यांच्या
अंतःकरणातून !
तसाच मलाही !

REFBK-0026234
REFBK-0026234